# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक १ जुलै, २०२४

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** तारांकित प्रश्न

**(ब)** गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **उप मुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री** | : | श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचा सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (२) | **उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री** | : | वस्तू व सेवा कर संस्था (GSTN) यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(शनिवार, दिनांक २९ जून, २०२४ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २)**

**(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील दहिसर गावठण येथे १३५ रेल्वे प्रकल्प बाधित तसेच बोरिवली (पूर्व) येथील नूतननगर, नेहरुनगर, संतोषनगर, दौलतनगर व दहिसर (प.) येथील इंदिरानगर या वस्तीत सुमारे १३०० पेक्षा जास्त झोपडीधारक गेल्या ३५ ते ४० वर्षापासून राहत असणे, या झोपडीधारकांकडे १९९५ चे ओळखपत्र, रेशनकार्ड, वीज बिल, फोटोपास आणि सेन्सेस सर्टिफिकेट इत्यादी सर्व कायदेशीर पुरावे असणे, परंतु या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनाकडून झोपडी निष्कासित करण्याची वारंवार नोटीस बजाविण्यात येणे, झोपडीधारकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी रेल्वे कार्यालय, मुंबई सेंट्रल येथे बोलविण्यात येणे व त्यावेळी त्यांच्याकडून आवश्यक पुरावे सादर करण्यात येणे, या झोपडीधारकांवर रेल्वे प्रशासनाकडून होणारी कारवाई स्थगित करण्याची होत असलेली मागणी, यासाठी रेल्वे प्रशासनाकडे राज्य शासनाने करावयाची शिफारस, दहिसर गावठाण येथील प्रकल्प बाधित व नूतननगर,

असुधारित प्रत

नेहरुनगर, संतोषनगर, दौलतनगर व दहिसर (प.) येथील इंदिरानगर या वस्तीतील झोपडीधारकांचे एमएमआरडीएच्या माध्यमातून पुनर्वसन करण्याची गरज, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. सुभाष धोटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील चंद्रपूर जिल्हास्थित राजुरा मतदारसंघातील गोंडपिपरी येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालय इमारतीचे बांधकाम सन १९८२ साली करण्यात आले होते परंतु सदरहू इमारत सद्य:स्थितीत पूर्णतः जीर्ण झालेली असणे, सदर इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण अहवालानुसार बांधकामस्थिरता प्रमाणपत्राची तपासणी केली असता सदर इमारत वापरण्यायोग्य नसल्याचे निष्पन्न झालेले असणे, सदरहू जर्जर, मोडकळीस आलेल्या इमारतीमुळे भविष्यात जीवित व मालमत्ता हानी होण्याची दाट शक्यता असणे, माहे मे, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान चंद्रपूर जिल्हा आरोग्य विभागाच्या पथकाने भेट देऊन रूग्णालय परिसराचे निरीक्षण केले असता सदरहू इमारत वापरण्यायोग्य नसल्याचे स्पष्ट नमूद केले असून तातडीने रूग्णालय इमारतीचे नव्याने बांधकाम करण्याची आवश्यकता नमूद केलेली असणे, मात्र महसूल व आरोग्य विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येणे, याबाबत जिल्हयाचे पालकमंत्री यांनी माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान आरोग्य व महसुल विभागाचे अधिकारी यांचेसमवेत बैठक घेऊन योग्य सूचना दिलेल्या असणे, मात्र रूग्णालय इमारतीचे बांधकाम करणेसाठी जागा उपलब्ध करून देणेसंदर्भात अद्यापही कोणतीही तातडीची कार्यवाही झालेली नसल्याने स्थानिक जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. विनोद निकोले, अमित विलासराव देशमुख, बाळासाहेब थोरात, नानाभाऊ पटोले, धिरज विलासराव देशमुख, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, राजेश एकडे, संजय जगताप, विकास ठाकरे, अबू आजमी, संजय पोतनीस, भास्कर जाधव, मोहन मते, डॉ. राहूल पाटील, श्री. अतुल भातखळकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती अश्विनी जगताप, सर्वश्री. सुनिल राऊत, सुनिल टिंगरे, प्रमोद पाटील, राम कदम, संजय केळकर, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. रवि राणा, ॲड. पराग अळवणी,ॲड. आशिष शेलार, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. पराग शाह, योगेश सागर, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री. सुनील राणे, वैभव नाईक, सुनिल प्रभू, जयंत पाटील, सुरेश वरपुडकर,डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. अमित झनक, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, सुरेश भोळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

" मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुरक्षेचे नियम डावलून शेकडो होर्डिंग्ज उभारण्यात आलेली असणे, शहर परिसरात इतस्ततः सर्वत्र होर्डिंगचे साम्राज्य असून

शहराची अवस्था बकाल झालेली असणे, अनेक होर्डिंग्ज कोणत्याही परवानग्या नसतांनाही उभारण्यात आल्याची बाब माहे मे, २०२४ मध्ये उघडकीस आलेली असणे, दिनांक १३ मे, २०२४ रोजी घाटकोपर, छेडानगर येथील अवाढव्य जाहिरात होर्डिंग कोसळून १६ जणांचा मृत्यू तर ९० पेक्षा जास्त व्यक्ती गंभीर जखमी झालेल्या असणे, वाहनांचे प्रचंड नुकसान होऊन सर्वसामान्यांना आर्थिक फटका बसलेला असणे, बेकायदेशीरपणे होर्डिंग उभारुन गैरव्यवहार करणारे रॅकेट मुंबईमध्ये कार्यरत असून महापालिकेचे सबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने सुरु असलेल्या कोट्यवधी रुपयांचा प्रचंड आर्थिक गैरव्यवहार, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री तसेच आयुक्त, मुंबई महापालिका यांचेकडे दिनांक १४ मे, २०२४ रोजी तसेच वारंवार मागणी केलेली असणे, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही व उपाययोजना करण्यास महापालिका प्रशासनाकडून होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, नागरीकांमध्ये भितीचे, असुरक्षिततेचे वातावरण पसरलेले असणे, सदर प्रकरणी कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, प्रशासनाच्या हेतुपुरस्सर दुर्लक्ष करण्यामुळे पुढील काळात सुरक्षेचे नियम डावलून उभारण्यात आलेले होर्डिंग्ज कोसळून जिवीत तथा प्रचंड वित्तहानी होण्याची शक्यता असल्याने सदर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगरपालिका विभागांमध्ये सरासरी १० ते १५ तक्रारी अवैध झोपडीबाबत दररोज नोंदवल्या जात असणे तर जिल्हाधिकारी कार्यालयातही झोपड्यांबाबतच्या सरासरी पाच ते दहा तक्रारी नोंदवल्या जाणे, मुंबई शहरातील विभागांनुसार झोपडीची किंमत घेतली जात असून सध्या गोवंडी, मानखुर्द भागात मात्र सहा ते सात लाखांमध्ये झोपडी मिळत असल्याचे निदर्शनास आलेले असतानाही लोकसभा निवडणुकीमुळे मुंबई महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालयाची अनधिकृत झोपड्यांवरील कारवाई थंडावली जाणे, याचा फायदा घेत मुंबई उपनगरात झोपड्या बांधण्याचा धंदा तेजीत आला असल्याने झोपड्यांची संख्या वाढू लागली असल्याची बाब दिनांक १६ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, मानखुर्द शिवाजीनगर विभागात बनवण्यात आलेल्या अवैध झोपड्यांकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करून परवानग्या देण्यात येणे, तसेच वर्षानुवर्ष अवैध असलेल्या झोपडपट्टीधारकांना आर.टी.आय. कार्यकर्ते वा अधिकाऱ्यांमार्फत वारंवार पैशाची मागणी करण्यात येणे, पैसे न दिल्यास आर.टी.आय. कार्यकर्त्यांकडून तक्रार करण्यास सांगून तात्पुरत्या स्वरूपात अतिक्रमण निष्कासित करणे, करण्यात आलेले अवैध बांधकाम निष्कासित करण्याकरिता येणारा खर्च हा संबंधितांकडून घेण्यात यावा असा महानगरपालिकेचा निर्णय असणे, तसेच निष्कासित करण्यात येणाऱ्या बांधकामाचा खर्च त्यावेळी जे

अधिकारी कार्यरत होते त्यांच्याकडून घेण्यात येण्याची मागणी करण्यात येणे, सदर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सिडकोच्या नवीन नांदेड प्रकल्पातील वाटप केलेली घरे मूळ मालकांनी बाँन्डवर विक्री केली असल्याचे माहे फेबुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले असणे, ही घरे अंदाजे १२०० इतकी असणे, सदरहू घरे यापूर्वी संदर्भान्वये संचालक मंडळाच्या ठरावाच्या अनुषंगाने सन २००५ मध्ये मूळ मालकांच्या अनुपस्थितीत हस्तांतर करुन देण्यात आलेली असणे, परंतु ही बाब प्रकल्पातील नागरिकांना माहिती न झाल्यामुळे अनेक घरे ही हस्तांतरीत झालेली असणे, सदर घरांवर बँक कर्ज प्रकरणे मिळत नसणे अथवा बांधकाम करणे अशक्य होत असणे, सिडकोची घरे ही नांदेड मनपाला माहे सप्टेंबर, २००५ मध्ये हस्तांतर करण्यात आली मात्र घराच्या बांधकामासाठी नांदेड मनपा परवानगी देत नसणे, उक्त नांदेड प्रकल्पातील असंख्य घर धारकांचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असणे, व सिडकोची थकबाकीही वसूल होत नसणे, त्यामुळे या मतदारसंघाचा विकास करण्याबाबत अडचणी निर्माण होत असणे तसेच विकास होत नसल्याने नागरिकांना त्यांच्या मुलभूत सोयी सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना लक्षात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. संजय सावकारे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाच्या महानिर्मिती उद्योगाची तब्बल ४,५५० कोटी रुपये गुंतवणूक असलेला भुसावळ-दिपनगर येथील ६६० मेगावॅट सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावर आधारित औष्णिक वीज प्रकल्प कार्यान्वित होण्यापूर्वीच तांत्रिक दोषात अडकला असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, सदरहू प्रकल्प महानिर्मितीच्या नियोजनानुसार माहे जून, २०२२ मध्ये कार्यान्वित होणे अपेक्षित असताना प्रकल्पाच्या सुमारे ४०० पैकी ३५ मीटर अंतराच्या बॉयलर ट्युब निकृष्ट असल्याचे चाचणीत उघडकीस आल्याने ट्युबचे भाग त्रयस्थ संस्थेच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, तेथील तपासणीत सुध्दा संबंधित बॉयलर टयुब अयोग्य ठरल्याने प्रकल्प रखडला असल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी मागील २ वर्षांपासून राज्यातील जनता हक्काच्या ६६० मेगावॅट विजेपासून वंचित राहिली असल्याची बाब उघडकीस येणे, प्रकल्प उभारणी करताना महानिर्मितीच्या तंत्रज्ञांचे दुर्लक्ष झाले का असा प्रश्न उपस्थित होणे, प्रकल्पाच्या विलंबास कारणीभूत ठरलेले महानिर्मितीचे तंत्रज्ञ व अधिकारी यांची चौकशी करून त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(७) सर्वश्री. रणधीर सावरकर, अतुल बेनके, सुनिल प्रभू, श्रीमती नमिता मुंदडा, श्री.अस्लम शेख, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्रीमती लताबाई सोनावणे, श्रीमती मंजुळा गावीत, श्री. शंकरराव गडाख, ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात बेसुमार वृक्षतोड झाल्याने वनक्षेत्र कमी होणे, वनक्षेत्र कमी होत असल्याने वन्य प्राणी नागरी वस्तीमध्ये शिरणे, वन्यजीव निवास व पिण्याच्या पाण्याची टंचाई यामुळे वन्य प्राणी मानवी वस्तीकडे तसेच शेतीमध्ये येऊन वन्य प्राण्यांकडून शेतातील पिकांचे प्रचंड नुकसान होणे, वन्य प्राण्यांचे मानवावर व पशुधनावर होणारे वाढते हल्ले, उदाहरणार्थ अकोला जिल्ह्यात २०१६-१७ या वर्षांमध्ये ३ हजार २५८ शेतकऱ्यांच्या पीक क्षेत्राचे वन्य प्राण्यांकडून नुकसान झाल्याने वन विभागातर्फे १ कोटी १७ लाख ४२ हजार रुपयांची शेतकऱ्यांना मदत करण्यात आली असली तरी मदत तोकडी असणे, शेतीला कुंपण घालण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांसाठी पूर्ण आर्थिक अनुदानीत योजना राबविणे, नुकसान भरपाईची मर्यादा वाढविणे, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाकडून आयुधांचा पुरवठा करणे तसेच नियमावलीत सुधारणा करणे, वन्य प्राण्यांमुळे शेतातील पीक किंवा फळबागांचे दरवर्षी सतत नुकसान होत असल्याने यावर सक्षमपणे कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. शिरीषकुमार नाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"आदिवासी विकास विभागातील आकृतीबंधानुसार भरती होत नसणे, आकृतीबंधाची पूर्णपणे अंमलबजावणी आदिवासी विकास विभागाकडून न होणे, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे गांभीर्याने न बघणे, परिणामी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने लक्ष घालून विद्यार्थ्यांचे आरोग्यसाठी जी.एन.एम. पद सर्वप्रथम भरण्याची आवश्यकता, सहाय्यक अधिक्षक या पदासाठी २०१ विद्यार्थ्यांची ठेवलेली अट रद्द करुन १ ते १०० विद्यार्थ्यामागे १ सहाय्यक अधिक्षक या प्रमाणे सुधारणा करण्याची आवश्यकता, आकृतीबंधाची पुनर्रचना करुन ५ वर्षांपेक्षा अधिक काळापासून रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची कायमस्वरुपी नेमणूक करणेबबात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

**(९) श्री. दादाराव केचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यातील १०४ गावात जल जिवन मिशन योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनेची कामे चालू असणे, सदर कामे अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमत करून काही विशिष्ठ कंत्राटदारालाच दिली असणे, तसेच पाईप लाईन टाकण्यासाठी सिमेंट रस्ते फोडण्यात आले असणे परंतु रस्त्यावर कॉंक्रीटीकरण वा डांबरीकरण करण्यात आलेले नसणे, पाणी पुरवठा करण्यासाठी वापरण्यात आलेले पाईप लोकल कंपनीचे Nineplast वापरण्यात येत असणे, पाईप लाईन टाकण्यासाठी नाली ही एक ते दिड फुट खोदण्यात येणे, पाईप लाईन पाण्याच्या दबावाने (प्रेशरने) फुटणे, त्यामुळे पाण्याचा अपव्यय होणे, तसेच पाण्याच्या टाकीचे बांधकाम करित असतांना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणे, त्यामुळे पाण्याच्या टाक्यांना गळती लागणे, कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता हे प्रत्यक्ष कोणत्याही योजनेच्या कामावर देखरेख करण्यास न जाणे, कंत्राटदार आपल्या मर्जीनुसार काम करीत असणे, कंत्राटदार व अधिकारी यांचे संगनमताने अर्ध्यावर कामे असतांना कंत्राटदारास पूर्ण देयके अदा करणे, त्यामुळे शासनाच्या पैश्याचा गैरवापर होणे, नागरिक पाण्यापासून वंचित राहणे, याकरिता मतदार संघातील १०४ पाणी पुरवठा योजनांची उच्च स्तरिय चौकशी करून अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री. अजय चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"म्हाडाच्या ५६ वसाहतीपैकी अभ्युदयनगर, काळाचौकी येथील म्हाडा वसाहतीच्या पुर्नविकासाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले असणे, अभ्युदयनगर, काळाचौकी येथील सन १९५६ पासून ३३ एकर जागेवर उभ्या असलेल्या वसाहतीमधील ४८ इमारती जीर्ण होऊन त्यांची दूरवस्था झाल्यामुळे म्हाडाकडून २००५ पासून इमारतींच्या पुर्नविकासाची प्रक्रिया रखडलेली असणे, पुर्नविकासाच्या कामात होणारे अक्षम्य दुर्लक्ष व सुरु असलेले वेळखाऊ धोरण, परिणामी अभ्युदयनगर, काळाचौकीतील जीर्ण व दूरवस्थेत असलेल्या ४८ इमारती केंव्हाही पडून जीवित व वित्त हानी होण्याचा धोका निर्माण झाल्याने या इमारतीत राहणा-या रहिवाश्यांमध्ये वाढती असुरक्षितता व निर्माण झालेले भितीचे वातावरण, म्हाडा प्राधिकरणासोबत व गृहनिर्माण मंत्री यांच्यासमवेत म्हाडा भवनात पुर्नविकासाच्या कामाबाबत म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या माध्यमातून झालेल्या संयुक्त बैठकीत निविदा काढण्याचा निर्णय झालेला असतांनाही निर्णयाच्या अनुषंगाने अद्याप कोणतीही कार्यवाही न होता निविदाही अद्याप काढण्यात आलेल्या नसणे, अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीमधील रहिवाश्यांना पुर्नविकासासंदर्भात विश्वासात घेण्यात न येणे, सदर वसाहतीचा पुर्नविकास सी ॲण्ड डी पध्दतीने करण्याबाबत शासनाने निर्णय घेणे, परंतु याबाबत रहिवाश्यांना कोणतीही पूर्व कल्पना/सूचना देण्यात आलेली नसणे, परिणामी अभ्युदयनगरमधील रहिवाश्यांमध्ये वाढणारे

अग्रिम प्रत

नैराश्याचे व तीव्र असंतोषाचे वातावरण, त्यानुषंगाने अभ्युदयनगर काळाचौकीमधील ४८ इमारतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२४

**(२)** सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४

**(३)** सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४

---------------------------------------------------------------------------

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४

**सात : (शनिवार, दिनांक २९ जून, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री आदित्य ठाकरे, सुनिल प्रभू, भास्कर जाधव, विक्रमसिंह सावंत, अनिल देशमुख, जितेश अंतापूरकर, लहु कानडे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री कैलास गोरंटयाल, रविंद्र धंगेकर, अस्लम शेख, हिरामण खोसकर, ॲड. के.सी.पाडवी, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री झिशान सिद्दीकी, कुणाल पाटील, अमीन पटेल, शिरीष चौधरी, संग्राम थोपटे, राजेश एकडे, राजन साळवी, धीरज देशमुख, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री वैभव नाईक, अमित देशमुख, रणजित कांबळे, अमित झनक, ऋतुराज पाटील, विकास ठाकरे, शिरीषकुमार नाईक, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री सुभाष धोटे, राजू आवळे, माधवराव जवळगावकर-पाटील, संजय जगताप, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, सहसराम कोरोटे, बाळासाहेब पाटील, विनोद निकोले, संदिप क्षीरसागर, राजेश टोपे, प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

असुधारित प्रत

"राज्यातील शेतकऱ्यांबद्दल शासन उदासीन असून शासनाची ध्येयधोरणे त्यांना उध्वस्त करण्याचे काम करीत असणे, सततची नापिकी, दुष्काळ, टंचाई, अवकाळी, कर्जबाजारीपणा, कृषी विभागाच्या अपुऱ्या सोईसुविधा अशा संकटांमुळे शेतकरी मेटाकुटीस येणे, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढणे, मात्र या गंभीर प्रश्नांकडे शासनाचे सोईस्कर दुर्लक्ष होणे, शेतमालाला हमीभाव न मिळणे, बियाणे, खते यांच्या दरात झालेली प्रचंड वाढ, यामुळे शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक कुचंबणा, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा हवेत विरणे, दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यातील परिस्थिती गंभीर होणे, गतवर्षीची मदत अत्यंत तुटपुंजी असून अद्यापही बऱ्याच संख्येने शेतकरी या मदतीपासून वंचित राहणे, पीक विमा कंपन्यांच्या मुजोरीमुळे पीक विमा योजनेचा बोजवारा उडाला असून याकडे शासनाचे सोईस्कर होत असलेले दुर्लक्ष, राज्यात एकीकडे भीषण पाणी टंचाई तर दुसरीकडे टँकर माफीयांची लुटालूट याने सामान्य नागरिक हवालदिल झाला असणे, पाण्यासाठी शेतकरी टाहो फोडत असताना शासन त्याबाबत संवेदनशील नसणे, दुष्काळ व पाण्याची भीषण टंचाई निवारण्याबाबत करण्यात आलेल्या अपुऱ्या उपाययोजना, "हर घर नल का जल" योजनेद्वारे कोट्यवधी रुपये खर्चुनही महिलांच्या डोक्यावर हंडा कायम असल्याने शासनाची फसवी ठरलेली "गॅरंटी", चारा छावण्या उभारण्याबाबत शासनाकडून होत असलेली दिरंगाई, परिणामी पशुधनाचे हाल होऊन शेतकरी अडचणीत आलेला असणे, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी होरपळत असताना शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीबाबत शासनाची असलेली अनास्था, माहे जानेवारी ते मे, २०२४ या कालावधीत अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळणे, कांद्यावर निर्यात बंदी असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी शासनाच्या चुकीच्या निर्यात धोरणांमुळे अडचणीत आलेला असणे, शेतकऱ्यांना योग्य तो लाभ मिळण्यासाठी कांदा, सोयाबीन, कपाशी, तूर, हरभरा, भुईमूग, धान, उडीद, मूग, हळद, मिरची इ. पिकांना योग्य तो दर मिळवून देण्यास शासनाला आलेले अपयश, परिणामी शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात होत असलेले आर्थिक नुकसान, धान, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवरील अन्याय कायम असणे, कोकणातील शेतकऱ्यांकडे सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, दूध उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने घोषित केलेले अनुदान न मिळणे यामुळे लाखांच्या पोशिंद्याला शासनाच्या नाकर्तेपणामुळे हात पसरण्याची वेळ आलेली असणे, तसेच गेल्या दोन वर्षात शासनाच्या विविध विभागांमध्ये उघडकीस आलेल्या भ्रष्टाचाराची व गैरव्यवहाराची शासनाकडून गांभीर्याने दखल घेतली न जाणे, स्मार्ट प्रीपेड मीटर योजना ही काही विशिष्ट उद्योगसमूहाला फायदा पोहोचविणारी असल्याने या योजनेबाबत जनतेत पसरलेला असंतोष, चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रात निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदीत करण्यात आलेला भ्रष्टाचार, आदिवासी विकास व शालेय शिक्षण विभागात गणवेश व इतर खरेदीमध्ये झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार, सार्वजनिक आरोग्य विभागात टक्केवारी, वसुली, बदल्या-पदोन्नतीत झालेला गैरप्रकार, ज्येष्ठता डावलून पदस्थापना, औषध तसेच रुग्णवाहिका खरेदीमध्ये झालेला हजारो कोटींचा घोटाळा, कामगार विभागात व बांधकाम कामगार मंडळामध्ये विविध योजनांमध्ये झालेला घोटाळा, राज्य उत्पादन शुल्क विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार तसेच आकृतीबंध पुनर्रचनेत झालेला गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागामध्ये सुरु असलेला भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या महसूल विभागात बोकाळलेला भ्रष्टाचार, फसलेले वाळू धोरण व वाळू माफियांचा हैदोस त्यामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड, सातारा जिल्ह्यातील झाडाणी,

ता. महाबळेश्वर गावात उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांसह तेरा जणांनी ६४० एकर जमिनीच्या खरेदीत केलेला गैरव्यवहार, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागामध्ये वाढत असलेल्या भ्रष्टाचारास शासनाचा पाठींबा असणे, सेंद्रीय शेतीसाठीचा निधी अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभारामुळे अखर्चित राहणे, या सर्व प्रश्नांबाबत शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २९ जून, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

असुधारित प्रत